आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१५ नोव्हेंबर २०२६ - गुरुवार

ठळक बातम्या

- एमपीएससी परीक्षा पद्धती सुधारणा समितीचा अहवाल राज्य सरकारला सादर, गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेतल्या जागा १६ हजार करण्याची शिफारस

- आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर २४ तासांच्या आत न्यायालयात हजर करणं बंधनकारक असल्याचं सर्वोच्च न्यायालयाचं स्पष्टीकरण

- सेन्सेक्समध्ये २ हजार तर निफ्टीमध्ये पावणे सहाशे अंकांची तेजी

- पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धांमधल्या पदक विजेत्या खेळाडूंसोबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संवाद

आणि

- दिग्गज फुटबॉलपटू क्रिस्तियानो रोनाल्डोची आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्तीची घोषणा

<><><><><><>

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या भर्ती परीक्षा पद्धतीतल्या सुधारणांसाठी स्थापन झालेल्या व्ही. राधा समितीनं आपला अंतरिम अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. या अहवालात राज्य लोकसेवा आयोगाच्या गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ मधली पदसंख्या ५ हजारांवरून १६ हजारांपेक्षा जास्त करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसंच विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार एक वेळची विशेष बाब म्हणून वयोमर्यादेत १ वर्षाची सवलत देण्याची शिफारस करण्यात आली आहे. १ जानेवारी २०२६ नंतर प्रसिद्ध झालेल्या मात्र निवड प्रक्रिया सुरू न झालेल्या सर्व जाहिराती, तसंच ३१ डिसेंबर २०२७ पर्यंत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींसाठी वयोमर्यादेतली ही सवलत लागू राहील. या सवलतीमुळे गट क परीक्षा २०२६ च्या अतिरिक्त पदांकरता पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना संधी मिळावी यासाठी अर्ज प्रक्रिया पुन्हा एकदा सुरू करण्याची शिफारसही करण्यात आली आहे. याचा शासन आदेश सामान्य प्रशासन विभागानं आज जारी केला.

प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटना टाळण्यासाठी यापूर्वीची प्रश्नपत्रिका निर्मितीची कार्यवाही रद्द करून सुरक्षित प्रक्रियेद्वारे नव्यानं प्रश्नपत्रिका तयार करणं, प्रश्नपत्रिका आणि ओएमआर

उत्तरपत्रिकांची छपाई, साठवणूक, वाहतूक यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवणं, परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही देखरेख, सिग्नल जॅमर आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची व्यवस्था करणं अशा शिफारशी समितीनं आपल्या अहवालात केल्या आहेत.

<><><><><>

एसटी महामंडळाच्या ८३ हजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रत्येकी १० हजार रुपये दिवाळी बोनस देण्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. यामुळे महामंडळावर सुमारे १६० कोटी रुपयांचा आर्थिक ताण येईल, पण महायुतीचं सरकार या कर्मचाऱ्यांच्या पाठीशी आहे, असंही ते म्हणाले. तसंच महागाई भत्ता ५८ टक्क्यावरून वाढवून ६० टक्के करणार असल्याचंही त्यांनी आज जाहीर केलं. याशिवाय, पात्र कर्मचाऱ्यांना साडे १२ हजार रुपये सण उचल देणार असल्याची माहितीही सरनाईक यांनी दिली.

होल्ड... बाईट- प्रताप सरनाईक

<><><><><>

निसर्गाचा आदर आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर हा भारतीय संस्कृतीचा स्थायीभाव आहे, असं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित भारत नवीकरणीय ऊर्जा शिखर परिषदेच्या समारोप सत्राला ते आज संबोधित करत होते. भारताने बिगर जीवाश्म इंधनांवरचं अवलंबित्व कमी करून वेगाने आर्थिक प्रगती केली असून हरित इंधनातून ३०० गिगावॅट ऊर्जा निर्मितीचं उद्दिष्ट पार केलं आहे, असं त्यांनी नमूद केलं. नवीकरणीय ऊर्जेमुळे भारताच्या खनिज तेल आयातीत शंभर बिलियन डॉलर्सची बचत झाली असल्याचं केंद्रीय नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

जंतरमंतरवर जुलै महिन्यात झालेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान पोलिसी बळाच्या कथित अवाजवी वापराचा तपास करणाऱ्या उच्चाधिकार चौकशी समितीनं एका महिन्याच्या आत अहवाल सादर करावा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत.

या समितीकडे आतापर्यंत मोजक्यात तक्रारी दाखल झाल्या असून एकाच व्यक्तीनं प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले. काही जणांनी समितीची वेबसाइट सुरू होण्यापूर्वी तक्रारी दाखल केल्या होत्या असं याचिकाकर्त्यांच्या वकील वृंदा ग्रोवर म्हणाल्या. तर पोलिसांनी केलेल्या अत्याचाराचे काही पुरावे सर्वोच्च

न्यायालयात सादर केले होते. ते समितीकडे सादर करावे असं वकील गोपाल शंकरनारायणन म्हणाले.

<><><><><><>

उच्च शिक्षण संस्थांसाठी यूजीसीच्या २०२६च्या समताविषयक नियमावलीचा आढावा घेण्यासाठी एक विशेष समिती स्थापन करत असल्याचं केंद्र सरकार आज सर्वोच्च न्यायालयाला सांगितलं. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठासमोर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी ही माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या चिंता दूर करण्यासाठी आणि कोणताही घटक वगळला गेल्याची किंवा असुरक्षित असल्याची भावना निर्माण होऊ नये, याची खातरजमा करण्यासाठी सरकार उपाययोजना तपासत आहे, असं त्यांनी सांगितलं. तरुण पिढीचं कल्याण आणि हित हे सर्व चर्चेच्या केंद्रस्थानी असायला हवं, असं न्यायालयानं स्पष्ट केलं, आणि यासंदर्भातल्या याचिकांवरची सुनावणी ४ आठवड्यांसाठी तहकूब केली.

<><><><><><>

अटक केलेल्या आरोपीला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यासाठीची २४ तासांची घटनात्मक मुदत, त्याला ताब्यात घेतल्याच्या क्षणापासून सुरू होत असल्याचं आज सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं. राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) अन्वये अटक आणि ताब्यात घेणं यात कोणताही कृत्रिम फरक करता येणार नाही. त्यामुळे अटकेपूर्वी ताब्यात ठेवलेल्या कालावधीला २४ तासांच्या मर्यादेतून वगळलं तर घटनात्मक तरतुदींचा भंग होईल, असं न्यायमूर्ती उज्जल भुयान आणि न्यायमूर्ती अतुल चांदुरकर यांच्या पीठानं स्पष्ट केलं. अटक केलेल्या ठिकाणापासून दंडाधिकारी न्यायालयापर्यंत पोहोचण्यासाठीचा वाजवी प्रवास वेळ या मुदतीतून वगळला जाऊ शकतो, असंही न्यायालयानं नमूद केलं.

<><><><><><>

अमेरिकेतल्या निवडणुकांच्या निकालानंतर पश्चिम आशियातल्या संघर्षावर तोडगा निघण्याची निर्माण झालेली शक्यता, कच्च्या तेलाचे कमी झालेले दर, यामुळे देशातल्या शेअर बाजारात आज जोरदार तेजी झाली. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स २ हजार ९ अंकांनी वधारून ७९ हजार ३१० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ५७६ अंकांची जबरदस्त तेजी नोंदवून २४ हजार ५३७ अंकांवर स्थिरावला. परदेशातून होणारी

गुंतवणूक, अमेरिकेसह इतर शेअर बाजारात झालेली तेजी याचाही चांगला परिणाम शेअर बाजारात झाला. गेल्या ६ सत्रांमध्ये सेन्सेक्सनं ६ हजारांहून अधिक, तर निफ्टीनं अठराशेहून अधिक अंकांची वाढ नोंदवली आहे.

<><><><><>

केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांची मध्यप्रदेशातून, राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली आहे. काँग्रेसचा पाठिंबा असलेले अपक्ष उमेदवार राजकुमार लोहानी आणि दुसरे अपक्ष उमेदवार कांते सायन्ना यांचे अर्ज अपुऱ्या कागदपत्रांमुळे अपात्र ठरवण्यात आले होते.

<><><><><>

जपानमध्ये झालेल्या आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी आपल्या कामगिरीने केवळ पदकंच नाहीत, तर कोट्यवधी देशवासियांची मनं जिंकल्याचे प्रशंसोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काढले आहेत. नवी दिल्ली इथं या खेळाडूंशी त्यांनी आज संवाद साधला. सर्वोच्च शिखरं गाठण्यासाठी दृढनिश्चय आणि धैर्याची गरज असल्याचं या खेळाडूंनी दाखवून दिल्याचं ते म्हणाले.

- - होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री - - -

खेळाडूंची ही कामगिरी भारत क्रीडाविश्वात एक मोठी शक्ती म्हणून उदयाला येत असल्याचं प्रतीक असल्याचंही ते म्हणाले. आगामी ऑलिम्पिकचा विचार करून तरुणांनी क्रीडा प्रतिभेच्या शोध मोहिमेत सहभागी व्हावं असं आवाहनही प्रधानमंत्र्यांनी केलं. देशातलं क्रीडा क्षेत्र प्रगती करत असून २०१४च्या ३ सुवर्ण पदकांच्या तुलनेत यंदा जिंकलेली ३० सुवर्णपदकं ही या प्रगतीचंच द्योतक असल्याचं, केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय म्हणाले.

<><><><><>

दिग्गज फुटबॉलपटू क्रिस्तियानो रोनाल्डो यानं आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. त्यानं आज समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. ६ विश्वचषक, १ युरोपीय अजिंक्यपद आणि आंतरराष्ट्रीय पुरुष फुटबॉलमध्ये सर्वाधिक गोल्सचा विक्रम रोनाल्डोच्या नावावर आहे. जगातल्या सर्वोत्तम फुटबॉलपटूंमध्ये त्याची गणना होते.

<><><><><>

एमपीएससीच्या परीक्षांची चौकशी करणाऱ्या आयोगानं उमेदवारांकडून विहित नमुन्यातच प्रतिज्ञापत्र सादर करायला सांगितलं आहे. आयोगानं प्रतिज्ञापत्राचा नमुना आज जारी केला. ही निवेदनं १६ नोव्हेंबर पर्यंत आयोगासमोर मांडण्याचं आवाहन ३० ऑक्टोबरच्या जाहीर सूचनेद्वारे केलं होतं.

//<><><><><><>//